लोकमत

पुणे, गुरुवार, दि. ४ जानेवारी २०१८

# अध्यक्षपदी मारुती चित्तमपल्ली यांची निवड

## पर्यावरणस्नेही साहित्य संमेलन रंगणार

लोकमत न्यूज नेटवर्क



पुणे : किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्र साहित्य परिषद आणि सर परशुराम भाऊ महाविद्यालय यांच्यातर्फे ६ जानेवारी रोजी सातव्या पर्यावरणस्नेही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ वन्यजीव अभ्यासक मारुती चित्तमपल्ली यांची निवड केली आहे. 'हे संमेलन विविध कार्यक्रमांनी रंगणार असून, विद्यार्थी पर्यावरण रक्षणासाठीचे विविध ठराव मांडणार आहेत.

संमेलनाचे उद्घाटन लेखक व संगणकतज्ज्ञ अच्युत गोडबोले यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटन सत्रानंतर 'चंगळवादी वृत्ती आणि पर्यावरण' या विषयावर त्यांचे भाषण होणार आहे. त्यानंतर 'प्रदूषित नद्या आणि आपण' या विषयावर परिणिता दांडेकर बोलणार आहेत. पारितोषिकविजेत्या विद्यार्थ्यांचे सादरीकरण होणार असून, उत्तरार्धात अंकुश आरेकर व लता ऐवळे हे 'रानातल्या कविता' सादर करणार आहेत. डॉ. सलील कुलकर्णी व सुप्रिया चित्राव यांचा 'हिरवाई' हा कार्यक्रम व त्यानंतर पारितोषिक वितरण होणार असून, संमेलनाध्यक्ष मारुती चित्तमपल्ली यांच्या मुलाखतीने समारोप होणार असून, जयंत कर्णिक संवाद साधणार आहेत. स. प. महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई सभागृहात सकाळी १० ते ५ या वेळेत संमेलन होणार आहे. महाविद्यालयीन युवकांचा सहभाग हे संमेलनाचे वैशिष्ट्य असल्याची माहिती प्राचार्य दिलीप शेठ यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनीताराजे पवार, महोत्सवाचे संयोजक वीरेंद्र चित्राव उपस्थित होते.

### ठरावांची अंमलबजावणी होणार

साहित्य संमेलनाप्रमाणे या संमेलनात विद्यार्थी पर्यावरण रक्षणासाठीचे ठराव मांडणार आहेत. स्वत:च्या जीवनशैलीपासून ते महाविद्यालयाच्या परिसरातील पर्यावरणाबरोबरच भोवतालच्या पर्यावरणाच्या रक्षणाविषयीचे हे ठराव सूचक - अनुमोदकासह मंजूर करण्यात येणार आहेत. या ठरावांची अंमलबजावणी होईल, असे मिलिंद जोशी यांनी सांगितले.

# 'क्लीन कॉलेज'साठी 'दहा मिनिट' प्रभावी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : 'दहा मिनिट' केवळ स्वच्छतेसाठी दिली तर देशाचे चित्र नक्कीच बदलेल... अशा आशयाची 'दस मिनिट' ही फिल्म पाहिली आणि खूपच प्रभावित झालो.

महाविद्यालयातील वर्गाच्या बाहेरचा कचरा स्वत: गोळा करायला लागलो ते पाहून वर्गातील मुले ओशाळली आणि सर, आम्ही करतो म्हणून उठली. पण तुम्ही अभ्यास करा, अजून दहा मिनिटं आहेत माझ्याकडे असे त्यांना सांगितले... मग कुठेही महाविद्यालयात कचरा दिसला, की स्वत: उचलू लागलो... विद्यार्थीही मदतीला येऊ लागले.. ही 'दस मिनिट' फिल्म महाविद्यालयातील ८ हजार विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना दाखविली आणि पाहता पाहता उभी राहिली 'ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेज'ची ही अभिनव चळवळ. या चळवळीमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणरक्षणाचा एक चांगला संदेश पोहोचला. स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप शेठ आपला अनुभव कथन करीत होते.

पर्यावरण हा विषय साचेबद्ध न राहता कॉलेजचा परिसर पर्यावरणपूरक राहावा, विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या रोजच्या जीवनात त्याचे प्रतिबिंब पडावे, या सर्व घटकांमध्ये पर्यावरणविषयक भान जागृत व्हावे, या हेतूने किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाच्या पुढाकारातून दोन वर्षांपासून 'ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेज' ही चळवळ राबविण्यास सुरुवात झाली आहे. यामध्ये शहरातील ८० महाविद्यालयांचा सहभाग असून टाकाऊ पदार्थ, ऊर्जा, वॉटर ऑडिट, प्रदूषण व जैवविविधता या पाच विषयांवर विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी काम करीत आहेत. त्यानुसार नॅशनल ॲसेसमेंट ॲंड ॲक्रिडिटेशन कौन्सिलकडून (नॅक) कॉलेजचे 'ग्रीन ऑडिट'ही केले जात आहे. स. प. महाविद्यालयामध्ये ही चळवळ राबविली जात असून, महाविद्यालयात अनेक सकारात्मक बदल झाले आहेत. सध्या महाविद्यालयात जैवविविधता, सोलर सिस्टीम, ओला सुका कचरा अशा २२ युनिटसह ऊर्जेची गरज लक्षात घेऊन एक मेथडॉलॉजी विकसित केली आहे. गेल्या वर्षी स. प. महाविद्यालयाने ग्रीन ऑडिट करुन घेतले. ते पाहून आमच्या मार्गदर्शनातून मॉडर्न महाविद्यालयानेही ग्रीन ऑडिट करुन घेतले असल्याची माहिती डॉ. शेठ यांनी दिली.

### ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेजच्या चळवळीचा विस्तार

सोलापूरची निवड झाली असून ५० कॉलेजमध्ये चळवळ नेणार आहे.

नॅकचे ग्रीन ऑडिट, सीएसआर निधी व स्वच्छ भारत चळवळ या सर्वांचा एकत्रित परिणाम महाविद्यालयांमध्ये दिसत आहे. ही चळवळ यापुढील काळात अधिक गतीने विस्तारणार आहोत. यासाठी सोलापूर जिल्ह्याची निवड करण्यात आली असून, २० शहरांतील १३० मधून निवडलेल्या ५० कॉलेजमध्ये ही चळवळ पोहोचविणार असल्याचे किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाचे संयोजक वीरेंद्र चित्राव यांनी सांगितले.